# औरंगाबाद ग्रामीण जिल्हा पोलीस

| पोलीस अधिक्षक, कार्यालय | **प्रेसनोट** | दिनांक २१/०९/२०१७ |
|---|---|---|

**प्रति,**
**सर्व सन्माननीय,**

आज दि.२१/०९/२०१७ रोजी मा.डॉ.आरती सिंह पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण यांनी वार्षीक तपासणी निमीत्त पोलीस ठाणे बिडकीन येथे भेट दिली. भेटी दरम्यान पोस्टेच्या अधिकारी व कर्मचारी यांची परेड घेण्यात आली. तसेच पोस्टे बिडकीनच्या नवीन इमारतीची पाहणी करुन पोस्टेच्या कामकाजाचा आढावा घेतला. गुन्हे संदर्भात मार्गदर्शन केले. पोलीस कर्मचारी यांचे वार्षीक शिट रिमार्क घेतले. तसेच पोस्टे हद्दीतील पोलीस पाटील यांची बैठक घेऊन त्यांना कामकाजाविषयी मार्गदर्शन केले. नुकत्याच पार पडलेल्या गणेशोस्तव व बकरी ईद काळात चांगल्या प्रकारे पोलीस दलास मदत केल्याबद्दल पोलीस पाटील यांचे अभिनंदन केले. चालु झालेल्या नवरात्रोस्तव तसेच आगामी मोहरम, ग्राम पंचायत निवडणुक काळात गावातील परिस्थीतीबाबत वेळीच पोलीसांना माहीती द्यावी याबाबत पोलीस पाटलांना मार्गदर्शन केले. पोलीस पाटलांनी त्यांचेकडील रेकॉर्ड अद्यावत ठेवणे बाबत सुचना दिल्या.

तसेच मा.पोलीस अधीक्षक यांनी सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा दरबार घेऊन त्यांचे वेतन, प्रवास भत्ता, साप्ताहीक सुट्टी बीले, रजा प्रवास सवलत घेते वेळी पोलीस कल्यान निधीतुन १०००/-रु.दिले जातात. अर्जीत रजेचे रोखीकरण, वैद्यकीय बीले इत्यादी अडचणी जाणुन घेऊन त्यांचे समाधान केले. तसेच पोस्टेतील सर्व कर्मचारी यांची पोलीस कुटुंब आरोग्य योजना कार्ड काढण्यासंबंधी सुचना केल्या. तसेच पोलीसांनी गणेशोस्तव व बकरी ईद दरम्यान चांगल्या प्रकारे बंदोबस्त केला याकरीता महाराष्ट्र शासनाणे पाच कोटी रुपये मंजुर केले असुन त्यातुन सर्व पोलीस कर्मचारी यांना योग्य ते बक्षीस दिले जाईल असे जाहीर केले. तसेच पोलीस ठाणे बिडकीन येथील शासकीय निवासस्थाना बाबत अडचण लवकरच मार्गी लावली जाईल असे आश्वासन दिले. पोस्टे कामकाज पारदर्शक पणे पार पाडावे जनतेशी चांगले संबध ठेवावे. तक्रारीची तात्काळ दखल घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच दुर्गा विसर्जन ठिकाणी कोणताही अनुचीत प्रकार घडणार नाही यासाठी योग्य तो बंदोबस्त लावण्याबाबत सुचना देण्यात आल्या. तसेच हद्दीतील फारोळा जलशद्धीकरण केंद्र येथे भेट देवुन तेथील अधिकारी व कर्मचारी यांना सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातुन योग्य त्या सुचना दिल्या. चितेगाव येथील उद्योगमित्र या औद्योगीक वसाहतीस भेट देवुन तेथील उद्योजकांशी चर्चा करुन त्याना सुचना देण्यात आल्या.

त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री सिध्दार्थ गाडे, सपोनी श्री पंडीत सोनवणे, व पोस्टेचे कर्मचारी, पोलीस पाटील हजर होते.

APS Damdge

**पोलीस अधिक्षक**
**औरंगाबाद ग्रामीण करिता**

Scanned by CamScanner